माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल केलेली तक्रार**

## क्र.मुमाआ/नों.क्र.५०५, ५०२ /२३ /त.क्र.५९, ६० /२६/०१

श्री.मंगेश बी. कदम

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता जलकामे (बांधकामे) पू.उप.
बृ.मुं.म.पा.कार्यकारी अभियंता जलकामे (बांधकामे) पू.उप. यांचे कार्यालय,
लाल बहादूर शास्त्री मार्ग, कामा लेन, ए.ई.ओ.सी. यार्ड, घाटकोपर (प.), मुंबई-४०० ०८६.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता जलकामे (बांधकामे) पू.उप.
बृ.मुं.म.पा.कार्यकारी अभियंता जलकामे (बांधकामे) पू.उप. यांचे कार्यालय,
लाल बहादूर शास्त्री मार्ग, कामा लेन, ए.ई.ओ.सी. यार्ड, घाटकोपर (प.), मुंबई-४०० ०८६.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १०.०३.२०२६**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित (ऑनलाईन) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

प्रस्तुत तक्रारीमध्ये तक्रारदार यांनी दि.२८/११/२०२२ च्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे त्यांनी विहित शुल्क भरल्यानंतरही तब्बल दहा महिन्याच्या विलंबाने त्यांना माहिती प्रदान करण्यात आली असल्याने यासंदर्भात शास्ती कारवाई तसेच भरलेले शुल्क परत करण्याची आग्रही विनंती केली असून **कलम ७ (६)** नुसार विहित मुदतीत माहिती प्रदान न केल्यास उपरोक्त माहिती ही विनामूल्य देण्याची तरतूद असून याप्रकरणी अपिलार्थींनी तक्रार क्रमांक ५९ व ६० यात नमूद केल्याप्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे शुल्क दाखल केले असतानाही त्यांनी माहिती बऱ्याच उशिरा व कुठल्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदान करण्यात आली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता प्रस्तुत तक्रार अर्ज अंशतः मंजूर करीत तक्रारदार यांनी रु.३७३०/- व रु.१३८८/- इतके शुल्क भरले असून ते तक्रारदारांना तात्काळ परत करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**१.वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२.वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १०.०३.२०२६**